# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१७४** **दिनांक - ०६/०५/२०२४**

**आश्रय लॉजिंग ॲण्ड बोर्डिंगवर छापा करवाई करुन एका पिडित मुलीची सुटका करण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश.**

दि. ०४/०५/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना बातमीदारकडून आश्रय लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग, शितल स्मृती बिल्डींग, नवघर फाटक रोड, गोडदेव नाक्याजवळ, नवघर, भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे या लॉजचे चालक/मालक, मॅनेजर व वेटर असे त्याचे लॉजमध्ये येणाऱ्या पुरुष गिऱ्हाईकांनी वेश्यागमनासाठी मुलींची मागणी केल्यास वेश्यागमनाचा मोबदला व रुमभाडे असा एकुण ३,०००/- रु घेवुन वेश्यागमनासाठी मुली पुरवितात.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन आश्रय लॉजिंग ॲण्ड बोर्डिंग, शितल स्मृती बिल्डींग, नवघर फाटक रोड, गोडदेव नाक्याजवळ, नवघर, भाईंदर पुर्व ता.जि.ठाणे या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १९.१५ वा छापा टाकला असता, नमुद लॉजिंगचे पाहिजे आरोपी मालक व चालक पुर्ण नाव पत्ता माहित नाही तसेच ताब्यात घेतलेले मॅनेजर १) महेश रामधनी यादव, वय-५६ वर्ष, २) वेटर राजेश रोहन प्रसाद, वय-३३ वर्ष, ३) वेटर जानाई नजेमुद्दीन मलिक, वय-४९ वर्ष, ४) वेटर दिपककुमार होरील यादव, वय-२८ वर्ष यांनी आपसात संगणम करुन एका पिडित मुलीस वेश्यागनमासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाच्या बोलीवर रक्कम ठरवुन स्वतःच्या उपजिवीकेकरीता रक्कम मॅनेजर महेश यादव याने स्वीकारल्याने त्यांना सापळयातील रोख रक्कम व इतर मुद्देमालसह ताब्यात घेवुन ०१ पिडित मुलीची सुटका केली आहे. सदर बाबत सफौ/ उमेश हरी पाटील यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने आश्रय लॉजिंग ॲण्ड बोर्डिंगचे पाहिजे आरोपी मालक व चालक तसेच ताब्यातील मॅनेजर आणि वेटर यांच्याविरुध्द नवघर पो.ठाणे गुन्हा रजि. क्र. I २८८/२०२४, भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ प्रमाणे दि.०५.०५.२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, सफौ/शिवाजी पाटील, पोशि/१२११८ केशव शिंदे, मपोशि/१३०७६ अश्विनी भिलारे, मपोशि/१४०६० शितल जाधव सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर व पोउपनिरी तुषार मोळोदे, पोहवा/०४००४ जी. व्हि जावळे, मपोशि/२३६१० एस. एस. सातकर नेम- नवघर पोलीस ठाणे यांनी केली आहे.